परिपत्रक क्र.संलेवको-२०१८/ निवे (सं.)/ न.क्र.३०/ ४२५

**संचालनालय, लेखा व कोषागारे,**
३ रा मजला, ठाकरसी हाउस, फॉरेन
पोस्ट ऑफिस जवळ, बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४००००१.
दिनांक: १२/१०/२०१८.

# परिपत्रक

**विषय:-** सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे लाभ वेळेवर प्रदान करणेबाबत प्राधान्याने कार्यवाही करणेबाबत.

सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन विषयक लाभ वेळेवर प्रदान केले जावे यासाठी मनासे निवृत्तीवेतन नियम १९८२ च्या प्रकरण दहा मधील विविध नियमानुसार वेळापत्रक विहित करण्यात आले आहे. सदरहू वेळापत्रकाचे पालन काटेकोरपने करण्याच्या अनुषंगाने वित्त विभागामार्फत वारंवार शासन निर्णय/ परिपत्रकांन्वये विभाग/ कार्यालय प्रमुख यांना वेळोवेळी सूचना निर्गमीत करण्यात येतात. तरीसुध्दा विभाग/ कार्यालय प्रमुखांकडून निवृत्तीवेतन, उपदान, भनिनि अंतिम प्रदान, रजा रोखीकरण प्रत्यक्ष अदा करण्याच्या विहित कार्यपध्दतीचे पालन न केल्यामुळे बऱ्याच प्रकरणी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना/ अधिकाऱ्यांना निवृत्तीवेतन विषयक लाभ विलंबाने प्रदान केले जात असलेचे निदर्शनास आले आहे. ही बाब गंभीर आहे. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, महालेखापाल कार्यालयाकडून प्राधिकारपत्रे निर्गमीत केल्यानंतरही विभाग/ कार्यालय प्रमुख यांचेकडून देयके कोषागारात प्रदानार्थ उशिराने सादर केली जात असलेचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे निवृत्तीवेतन धारकांना मानसिक तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागत असून विलंबाने निवृत्तीवेतन विषयक प्रदाने होत असलेने न्यायालयीन प्रकरणांची संख्या देखील वाढत आहे. ही बाब प्रशासकीय दृष्ट्या उचित नाही. अशा न्यायालयीन प्रकरणांमुळे शासनाच्या वेळेचा व पैशाचा अपव्यय होत असून रकमा उशिरा अदा केल्यामुळे सदर रकमांवर व्याज प्रदान करावे लागत आहे. यापुढे विलंबाने प्रदान झालेस देण्यात येणाऱ्या व्याजाचे रकमेची जबाबदारी निश्चित करणे भाग पडेल याची सर्व संबंधीत कार्यालयांनी नोंद घ्यावी.

शासन निर्णय दिनांक १८.०८.२००८, ०२.०७.२०१५ व ३०.१२.२०१५ अनुसार शासकीय कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतन प्रदान करण्याकरिता सुधारित कार्यपध्दती लागू करण्यात आली आहे. त्यानुसार निवृत्तीवेतन प्रदान आदेश प्राप्त झाल्यानंतर नमुना अ, नमुना ब, नमुना ४२-अ व नमुना क (शासन परिपत्रक दिनांक १८.०७.२०१८) असे हे नमूने दहा दिवसांच्या आत ऑनलाईन तसेच पोस्टाद्वारे दहा कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांच्या आत प्रदान कोषागारास स्पीड पोस्ट/ रजिस्टर ए.डी./ हस्त बटवडा च्या माध्यमातून पाठविणे नियमानुसार अनिवार्य आहे. असे असतानाही बऱ्याच

विभाग/ कार्यालय प्रमुखांकडून सदरचे नमुने उशिराने कोषागारात सादर केले जातात. त्यामुळे कोषागारामध्ये अनेक निवृत्तीवेतन प्रदान आदेश प्रलंबित राहतात. परिणामी सेवानिवृत्तीवेतन विषयक लाभ संबंधीतांना अदा होणेस दिरंगाई होत असलेचे निदर्शनास आले आहे.

सर्व विभाग/ कार्यालय प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, महालेखापाल कार्यालयांकडून निवृत्तीवेतन प्रदानाचे प्राधिकारपत्र प्राप्त झाल्यानंतर आवश्यक प्रमाणपत्रे दहा कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांच्या आत प्रदान कोषागारास पाठविणे नियमानुसार अनिवार्य आहे. अन्यथा संबंधीत विभाग/ कार्यालय प्रमुख यांचे अधिपत्याखालील प्रलंबित निवृत्तीवेतन प्रदान आदेशांची माहिती त्यांच्या संबंधीत विभागास पाठवून योग्य ती कारवाई करण्याकरिता प्रस्तावित करणेत येईल. महालेखापाल कार्यालयांकडून उपदान, भ.नि.नि. अंतिम प्रदान या प्रकारची प्राधिकारपत्रे प्राप्त झाल्यानंतर एका महिन्याच्या आत प्रदानाकरिता आवश्यक देयके संबंधीत कोषागारास सादर करण्यात यावी. अन्यथा प्रलंबित प्राधिकार पत्रांबाबत संबंधीत विभागास पत्राद्वारे सूचित करण्यात येईल. तसेच अशी कार्यवाही विहित वेळेत पूर्ण न झाल्यास व त्या प्रकरणी व्याज प्रदान करण्याचा प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतची सर्व जबाबदारी संबंधीत विभाग/ कार्यालय प्रमुखांवर राहील. याची सर्वांनी नोंद घेऊन प्रकरणी उचित कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करणेची दक्षता घेणेत यावी.

(ज.र.मेनन)
संचालक
लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१. सर्व कोषागार अधिकारी, व अधिदान व लेखा कार्यालय.
२. उप सचिव, वित्त विभाग, सेवा-४, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
३. सर्व कार्यालय प्रमुख /आहरण व संवितरण अधिकारी.